# विद्यावार्ता®

विशेषांक, डिसेंबर-२०१७

2017-18
A-DP

# समीक्षा

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | UGC Approved Jr.No.62759 | Vidyawarta® | December 2017 Special Issue | 02

# ADVISORY BOARD

**Prof.Virag Gawande**
Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.
**Prof.Dr.Sanjay j. Kothari**
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati
**Prof.Dr.Dinesh W.Nichit**
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage Walgaon Dist. Amravati
**Dr. Dhnyaneshwar Yawale**
Sant Gadge Maharaj Mahavidyalay Walgaon, Dist. Amravati,
**Dr. Kundan Ajabrao Alone**
Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Dist. Amravati,
**Dr. Sharda S. Gawande**
B.S.Patil Mahavidyalaya, Paratwada &Chairman, Board of Studies -Home EconomicsS.G.B. Amravati University
**Dr. Priya Wanjari**
Vice Principal Santaji Mahavidyalay,Nagpur, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University.
**Dr. Shubhangi K. Dange**
Ex-Chairman, Coordinator Board of Studies–Home Economics R.T.M. Nagpur University,Nagpur
**Dr. Udaysinh R. Manepatil**
Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji, Dist- Kolhapur Shivaji University, Kolhapur
**Dr. Vijay Sarthi,**
Principal, S.P. College Pulgaon, Dist. Wardha. Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University
**Prof.Dr. Shabab Rizvi**
Pillai's College of Arts, Commerce & Science, New Panvel, Navi Mumbai, Mumbai,University

North Maha. University, Jalgaon. Approved
जा.क्र.उमवि/२१/इ.अ.मं./३९३/२०१३
Dt.२२.१०.२०१३

Harshwardhan Publication Pvt.Ltd. International Multilingual Research Journal
VIDYAWARTA ISSN-2319 9318
PRINTING AREA ISSN-2394-5303

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

Note : The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Vidyawarta' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university,institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Vidyawarta is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at Beed (Maharashtra, India)

लिंगगुणोत्तर नागरी भागाच्या तुलनेत आदिवासी आणि ग्रामीण भागात उच्च असून घटलेल्या लिंगगुणोत्तराचा अभ्यास करणे.

**अभ्यास क्षेत्र :-**

नाशिक जिल्हा महाराष्ट्राच्या उत्तरभाग १९० ३३। ते २०० ५३। उत्तर अक्षांश व ७३० १६। ते ७५० १६। पूर्व रेखांश या भौगोलिक पट्ट्यात विभागलेला आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्र १५५३० चौ. कि.मी. असून राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ५.०४ टक्के क्षेत्र जिल्ह्याने व्यापलेले आहे. नाशिक जिल्ह्यात एकूण १५ तालुक्यांचा समावेश झालेला आहे. नाशिक जिल्हा हा 'मिनी महाराष्ट्र' म्हणून ओळखला जातो. कारण महाराष्ट्रातील सर्व विविधता जिल्ह्यात आढळून येते. तसेच जिल्ह्यातील उत्पादीत होणारा भाजीपाला व दूध मुंबई शहराला पुरविले जात असल्याने जिल्ह्याची ओळख मुंबईची 'परसबाग' व 'गवळीवाडा' म्हणून केली जाते.

30

# नाशिक जिल्ह्यातील लिंगगुणोत्तराचे विश्लेषण (१९५१ ते २०११)

प्रा. डॉ. अनिल डी. पवार
म. सं. गा. महाविद्यालय, मालेगांव कॅम्प, जि. नाशिक

**प्रस्तावना :-**

सजीव प्राण्यांमध्ये पुर्णः उत्पादनासाठी स्त्री-पुरुष किंवा नर-मादीची आवश्यकता असल्याने स्त्री-पुरुष एकत्रीकरणातून ही प्रक्रिया पुर्ण होते. निसर्ग नियमाप्रमाणे हे प्रमाण सारखेच निर्माण होतांना दिसून येते. निकोप सामाजिक जीवनाच्या दृष्टीने लोकसंख्येमध्ये स्त्री-पुरुषांचे प्रमाण समान असावे असे मानले जाते. मात्र समाज रचनेत स्त्री-पुरुष प्रमाणात विषमता निर्माण झाल्याचे निदर्शनास येते. जागतिक लोकसंख्येतही पुरुषांची लोकसंख्या स्त्रियांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. भारत महाराष्ट्र आणि नाशिक जिल्हाही यास अपवाद नाहीत. म्हणून आदर्श सामाजिक व लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्टयांच्या अभ्यासामध्ये दरहजारी स्त्रियांची संख्या विचारात घेतली जाते.

सदर शोध निबंधात महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्याच्या लिंग गुणोत्तराचे विश्लेषण केलेले आहे. याबाबत राज्य आणि जिल्ह्याच्या १९५१ ते २०११ या कालावधीची निवड करुन आकडेवारी नुसार तुलना करण्यात आलेली आहे. सन २०११ नुसार राज्याचे लिंग गुणोत्तर ९२५ इतके असून जिल्ह्याचे प्रमाण ९३१ म्हणजेच राज्याच्या तुलनेने ते ६ ने अधिक आहे. याच कालावधीत राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ८२.९१% तर जिल्ह्यातील साक्षरता प्रमाण ८०.९६% इतके आहे.

भरतातील सध्या स्त्री -पुरूष विषमतेमुळे निर्माण झालेल्या समस्येचा अभ्यास करणे. यामध्ये स्वातंत्र्यानंतरचा कालावधी निवडण्यात आलेला असून स्त्रीयांच्या घटत्या प्रमाणाचा सामाजिक जिवणावर परिणाम होतांना दिसून येत आहे. उदा. विवाह योग्य मुलांना आज विवाहासाठी मुली मिळत नसल्याने मुली पळवून आणणे, दोन-तीन भावांनी मिळून एकच बायको हे आणि असे अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसून येत आहेत.

**उद्दीष्ट्ये :-**

| वर्ष | राज्य | | | जिल्हा | | | लिंग गुणोत्तर तफावत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी |
| १९५१ | ९४१ | १००० | ८०७ | ९४६ | ९७४ | ९०३ | ५ | २६ | ९६ |
| १९६१ | ९३६ | ९९५ | ८०१ | ९४३ | ९६३ | ८७२ | ७ | ३२ | ७१ |
| १९७१ | ९३० | ९८५ | ८२० | ९४० | ९५३ | ८५५ | १० | ३२ | ३५ |
| १९८१ | ९३७ | ९८७ | ८५० | ९३७ | ९५९ | ८२९ | ०० | २८ | २१ |
| १९९१ | ९३४ | ९७२ | ८७५ | ९३९ | ९५५ | ९१५ | ५ | १७ | ४० |
| २००१ | ९२२ | ९६० | ८७३ | ९२५ | ९६५ | ८९२ | ३ | ५ | १९ |
| २०११ | ९२५ | ९५२ | ८९९ | ९३१ | ९४२ | ९१३ | ६ | १० | १४ |

भारतीय जनगणना प्रकाशन १९५१ ते २०११

नाशिक जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ १९५१ ते २०११

इ.स. १९५१ ते २०११ या कालावधीत जिल्ह्यातील १५ तालुक्यांची वरील तक्त्यानुसार आकडेवारी अभ्यासली असता आदिवासी बहुल तालुक्यांमध्ये लिंगगुणोत्तर उच्च असल्याचे निदर्शनास येते. १९५१ मध्ये जिल्ह्यातील सिन्नर १९१, निफाड ९९४, बागलाण ९८७, मालेगांव ९८०, दिंडोरी ९७६ याप्रमाणे ग्रामीण प्रमाण होते तसेच नागरी भागातही हे प्रमाण नाशिक (८४७) वगळता सर्वत्र सरासरी ९५० च्या पुढेच होते. साधारणपणे १९५१ ते १९८१ या ३० वर्षांच्या कालावधीत जिल्ह्यांतच लिंग गुणोत्तरामध्ये फारसा बदल झालेला आढळत नाही. १९८१ च्या आकडेवारीनुसार इगतपुरी तालुक्यांच्या ग्रामीण भागात सर्वात कमी ८५९ इतके प्रमाण असून पेठ, सुरगाणा, कळवण तालुक्यांमध्ये अनुक्रमे ९८०, ९७६, ९७६ या प्रकारे स्रीयांचे प्रमाण दिसून येते. या जनगणना कालावधीत नागरी भागातील नाशिक (८३७), चांदवड (८६०) या तालुक्यांमध्ये स्रीयांचे प्रमाण बरेच कमी असून इतर तालुक्यांमध्ये हे प्रमाण तुलनेने अधिक आहे.

१९८१ ते २०११ या देशाच्या जणनदरामध्ये घट झालेल्या कालावधीत जिल्ह्याच्या लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता हे प्रमाण कमी-कमी होत गेल्याचे निदर्शनास येते. या कालावधीत जिल्ह्याच्या साक्षरता वाढीबरोबरच इतर क्षेत्राचाही विकास वेगाने होत गेलेला असून लिंगगुणोत्तर प्रमाणात मात्र घट होत गेल्याचे निदर्शनास येते. १९९१ व २००१ च्या जणगणना कालावधीची तुलना केली असता आदिवासी तालुके वगळता इतर तालुक्यांच्या प्रमाणात घट होतांना दिसून येते. या [illegible]वधीत १९९१ नुसार एकूण ग्रामीण प्रमाण ९५५ तर नागरी ९१५ इतके असून २००१ च्या जनगणनेनुसार ग्रामीण ९४५ व नागरी ८९३ इतके आहे. म्हणजेच ग्रामीण भागातील लिंगगुणोत्तरामध्ये १० ने तर नागरी प्रमाणामध्ये २२ ने घट झाल्याचे निदर्शनास येते. मात्र १९९१ ते २०११ या जनगणना कालावधी दरम्यान ठिकठिकाणी सापडलेली मृत स्री अर्भक सापडू लागल्याने तसेच समाजातील स्रीयांच्या घटत्या प्रमाणामुळे निर्माण झालेल्या समस्या लक्षात येऊ लागल्याने समाज व शासनास जाग आली. तोपर्यंत स्री-पुरुष समानता, कुटूंब नियोजनास विरोध माणनारे मुस्लीम बहुल नगर असलेल्या मालेगांव तालुक्यातील नागरी भागात २००१ मध्ये दरहजारी [प्र]माण ९५७ ते २०११ मध्ये ९६० असे प्रमाण होते तर २०११ [म]ध्ये नागरी भागातील नाशिक ८९५, सिन्नर ८८३, चांदवड ८९८ याप्रमाणे म्हणजे दरहजारी पुरुषांमागे ९०० च्या आत स्रीयांचे प्रमाण होते. मात्र ग्रामीण भागातील सुरगाणा १००२, पेठ ९८५, त्र्यंबक ९८३, कळवण ९८३ याप्रमाणे आदिवासी बहुल तालुक्यांमध्ये तुलनेने स्रीयांचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास येते.

१९८१ नंतर जिल्ह्यात सुरु झालेल्या सोनोग्राफी केंद्राची संख्या ४११ इतकी असून नाशिक महानगरामध्ये २१०, मालेगांव नगरामध्ये ६५ केंद्र असून ग्रामीण भागातील एकूण केंद्राची संख्या १३६ इतकी आहे. सर्वात जास्त केंद्र निफाड तालुक्यात २८, सटाणा २५, चांदवड १२, नांदगांव १२, येवला १०, सिन्नर ९ याप्रमाणे इतरही तालुक्यात सोनोग्राफी केंद्र आढळतात. सहाजिकच यापैकी काही केंद्रामध्ये गर्भनिदान लिंग चाचण्या होत असल्याचे निदर्शनास आले आहे. जिल्ह्यातील नाशिक, सिन्नर, चांदवड, येवला, नांदगांव व इतरही तालुक्यांमध्ये लिंगगुणोत्तर कमी होण्यामागे या लिंगनिदाण चाचण्या कारणीभूत झालेल्या आहेत. मात्र आदिवासी बहुल तालुक्यांमध्ये मात्र अशा प्रकारच्या केंद्राचा प्रभाव झालेला नाही.

शासन स्तरावर सर्वत्र स्री-पुरुष प्रमाणात सारखेपणा आणण्यासाठी, वाढविण्यासाठी समाजाची म्हणजेच आपली सगळ्यांची मानसिकता बदलणे गरजेचे झालेले आहे. कारण सद्यस्थितीस विवाहयोग्य मुलांना विवाहासाठी मुली मिळत नसून दोन किंवा तीन भावांना एकच बायको, एजंट मार्फत पैसे देऊन बायको मिळविली जात आहे. या व अशा अनेक अडचणी व समस्या निर्माण होत असून त्या सोडविण्यासाठी सगळ्यांनीच पुढाकार घेणे गरजेचे आहे. आज पुरुषांच्या बरोबरीने स्रीया देखील सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. याचेही भान ठेवणे महत्वाचे आहे.

**संदर्भ :-**

१) जणगनणा अहवाल १९५१ ते २०११

२) नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्या - एक भौगोलिक अध्ययन - १९४७-२०११ पीएच्.डी. प्रबंध, प्रा. डॉ. अनिल डी. पवार

३) दिवाळी विशेष - राष्ट्रवादी मासिक, ऑक्टो-नोव्हें. २००७ पा. नं. ३३ वंदना साळसकर.

४) अहमदनगर जिल्ह्यातील लिंग रचना भौगोलिक विश्लेषण, महाराष्ट्र भूगोलशास्र संशोधन पत्रिका खंड २३, अंक १ पृष्ठ क्र. ८ ते १४, नरके एस. वाय. व सहकारी (२००८)

५) मालेगांव शहराचा भौगोलिक अभ्यास (१९५० ते २००१) पीएच.डी. प्रबंध, रविंद्र शिवाजी देवरे. (२००५)